# जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १०वा मजला , चेतना कॉलेज समोर मुंबई - ४०००५१
दुरध्वनी क्र./ फॅक्स : २६४२१८७४ Email ID: dslrmsd@yahoo.com

क्र.न.भू.स. ३अ/मि.अ.अक्षरी नोंद/२०१५ /२
दिनांक : 31 /०७/२०१५

प्रति,

१) उपप्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव)
पश्चिम उपनगरे-१, वांद्रा (पश्चिम)
२) उपप्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव)
पश्चिम उपनगरे-२, कांदिवली (पू)
३) उपप्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव)
पूर्व उपनगरे-१, विक्रोळी (पश्चिम)
४) उपमुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,वांद्रा,

विषय: मिळकत पत्रिकेवरील क्षेत्राचे अक्षरी प्रमाणपत्र घेणेबाबत.

संदर्भ : १) मा.जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचेकडील परिपत्रक क्र.ना.भू.१/मि.प.अक्षरी नोंद/२०१५ दिनांक ०९/०२/२०१५
२) मा.विशेष कार्य अधिकारी, महसुल व वनविभाग,मंत्रालय, मुंबई यांचेकडील नं. सिटीएस-१०८३/४५८४३/३३६८/ल-९/मुंबई दिनांक १९/०९/१९८५

महोदय,

मुंबई शहर जिल्ह्यामध्ये दिल्या जाणाऱ्या प्रॉपर्टी रजिस्टर उताऱ्यावर त्या भूकर क्रमांकाचे क्षेत्र अंकी तसेच अक्षरी नमुद केलेले असते. मात्र मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये दिल्या जाणाऱ्या मिळकत पत्रिकेच्या उताऱ्यावर नगर भूमापन क्रमांकाचे क्षेत्र फक्त अंकी नमुद केलेले असते. त्यामुळे मिळकत पत्रिकेवर खाडाखोड होण्याची शक्यता असते. त्यामुळे सदर गैरप्रकारांना आळा बसावा या उद्देशाने उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये मिळकत पत्रिकेवर अक्षरी क्षेत्र नमुद करणेबाबतचे परिपत्रक मा.जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचे कार्यालयाकडून निर्गमित झालेले आहे.

सदर उपरोक्त संदर्भिय परिपत्रक क्र.१ प्रमाणे मिळकत पत्रिकेवरील नमुद क्षेत्र व चौकशी नोंदवहीतील क्षेत्र यांची पडताळणी करून व रितसर फेरफाराची आडवी नोंद घेऊन अक्षरी क्षेत्र नमुद करावे अशा सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणे इकडील अधिनस्त नगर भूमापन अधिकारी कार्यालयाकडून मिळकत पत्रिकेवर असलेल्या अंकी क्षेत्राप्रमाणे अक्षरी क्षेत्राची आडवी नोंद घेणेत आलेली आहे. अशा नोंदी केवळ चौकशी नोंदवहीतील नमुद क्षेत्रावरुन घेण्यात येत असून सदर क्षेत्रामध्ये भविष्यात कार्यालयातील अभिलेख, मूळ बसलेबार, मूळ नगर भूमापन आलेख यातील चुका अथवा जागेवरील वस्तुस्थिती याप्रमाणे भविष्यात क्षेत्र /हद्द दुरुस्ती होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मिळकत पत्रिकेवरील सद्य नमुद असलेल्या क्षेत्रात बदल होऊ शकतो.

मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये शासनाकडील संदर्भ क्र.२ मा.विशेष कार्य अधिकारी, महसुल व वनविभाग,मंत्रालय, मुंबई यांचेकडील नं. सिटीएस-१०८३/४५८४३/३३६८/ल-९/मुंबई दिनांक १९/०९/१९८५ अन्वये

अर्जदार यांनी अर्ज सादर केल्यानंतर सदर मिळकतीचे कार्यालयातील अभिलेख, मूळ वसलेवार,मूळ नगर भूमापन आलेख यावरुन क्षेत्राबाबत खात्री करुन अर्जदार यांना द्यावयाच्या नकलेवर तसे प्रमाणपत्र देणेची पध्दत सन १९८५ पासून कार्यान्वीत आहे. प्रचलित पध्दतीत ज्या मिळकतीच्या क्षेत्रात/हद्दीत दुरुस्ती/बदल झाला असेल अशा मिळकतीच्या नकला संदर्भ क्र. २ अन्वये जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा यांचे स्तरावरुन दिल्या जात आहेत. त्याप्रमाणे जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर व नगर भूमापन अधिकारी यांचे कार्यालयाकडून मूळ कार्यालयीन अभिलेख, मूळ आलेख, वसलेवार व इत्यादी मूळ अभिलेख यावरुन खात्री /पडताळणी होऊन मिळकत पत्रिकेवरील क्षेत्राचे अक्षरी प्रमाणपत्र इकडील कार्यालयाकडून देणेत येते. त्यामुळे मिळकत पत्रिकेवरील क्षेत्राचे अक्षरी प्रमाणपत्र इकडील कार्यालयाकडून प्राप्त केल्याशिवाय कुठल्याही स्वरुपाचा इमारत बांधकाम प्रस्ताव, विकास योजना प्रस्ताव अथवा चटई क्षेत्र निर्देशांक यास मंजूरी देणे उचित ठरणार नाही.

तरी आपलेकडून दिल्या जाणाऱ्या इमारत बांधकाम आराखडा, विकास योजना, चटई क्षेत्र निर्देशांक मंजूरी करीता सद्यस्थितीत कार्यान्वित असलेनुसार मिळकत पत्रिकेवरील क्षेत्राबाबतचे इकडील कार्यालयाकडील प्रमाणपत्र अर्जदार यांचेकडून पुर्वीप्रमाणे संदर्भिय पत्र क्रमांक २ अन्वये घेणेत यावे.

सोबत संदर्भिय क्र. १ व २ ची छायांकित प्रत असे.

३१/७/१५

(महेश इंगळे)
जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख
मुंबई उपनगर जिल्हा